# बी. एस. एस. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय माकणी , ता. लोहारा जि. उस्मानाबाद.

बी.ए.द्वितीय वर्ष  मराठी (ऐच्छिक) पेपर क्र.५

प्रा. डॉ. काकासाहेब सुरवसे
मराठी विभाग प्रमुख.

# प्रकरण १ ले. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची पार्श्वभूमी :-

कोणत्याही कलाकृतीचा इतिहास लिहिण्याची साधने भौतिक आणि वाङ्मयीन असतात. मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्यासाठी वाङ्मयीन ग्रंथाचे संग्रह साधन ठरतात. तर भाषा हे माध्यम आहे. भाषेला मानवाने म्हणजे समाजाने जन्म दिला म्हणजेच भाषा ही समाजाने निर्माण केली आहे. आणि भाषेतून साहित्य निर्मिती होते. भाषा हे साहित्याचे कोणत्याही कलाकृतीचे माध्यम आहे. तर समाजजीवन साहित्याची सामुग्री आहे. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. त्या आरशात समाज जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. भाषा, साहित्य, आणि संस्कृती समजा हे एकमेंकाशी निगडीत आहेत. भाषेच्या माध्यमातून साहित्य, संस्कृती, कलांचे जतन, संवर्धन केले जाते.

इतकेच काय भाषेच्या माध्यमातून प्रत्येक क्षेत्राचा इतिहास लिहिला जातो. प्रत्येक गोष्टीला, वस्तुला एक इतिहास असतो. तो भावी पिढीसाठी जतन केला जातो. भाषा हे मौलीक माध्यम आहे. भाषेविना समाज आणि समाजाविना भाषा आणि भाषेविना साहित्य यांची कल्पना करता येत नाही. ज्यांना स्वतःची भाषा असते, त्यांना स्वतःची संस्कृती, स्वतःचा धर्म, साहित्य निर्माण करता येतो. इतिहास हा प्रत्येक क्षेत्राचा असतो. संस्थेचा, शिक्षणाचा, धर्माचा, भाषेचा, कलेचा तसाच साहित्याचा इतिहास असतो, आहे.

इतिहास आणि वाङ्मयाचा इतिहास वेगळा आहे. इतिहास हा भौतिक साधनांना प्राधान्य देतो, तर वाङ्मय इतिहास लिखित कलाकृतींना प्राधान्य देते. कोणत्याही क्षेत्राचा इतिहास काळानुरूप बदलत आलेला असतो. कालखंड बघावा लागतो. जेव्हापासून इतिहासाची साधने उपलब्ध झाले, त्या अगोदरचा काळ हा प्रगैतिहासाच्या त्याअगोदरचा

काळ आदिम काळ आहे. आदिम काळातील पुरावे मानववंशशास्त्राचा आधारे शोधावे लागतात. नंतर प्राचीन काळ येतो. त्यास मध्ययुगीन काळ म्हणतात. भारताचा प्राचीन इतिहास पुराणाचा, महाकाव्याचा आहे. 'मिथ आणि इतिहास' यांच्या एकरूपतेतून सत्य शोधले की, इतिहास सापडतो. मध्ययुगीन काळातील स्थल-काल-व्यक्ती सांगता येतात. प्राचीन, मराठी वाङ्मय हे मध्ययुगीन काळातील आहे. यादवाच्या अगोदचा काळ प्राचीन नंतरचा काळ मध्ययुगीन म्हणजे त्यास 'सत्ययुग' चा काळ म्हणतात. पुढे आधुनिक काळ हा इंग्रज आल्यापासून सुरू होतो. नवा काळ म्हणजे वर्तमान...चालू काळ म्हणता येईल. त्यानंतर आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास शीर्षकात मराठी शब्द येतो. महाराष्ट्राची मराठी भाषा आहे. महाराष्ट्रात राहणारा आणि मराठी भाषा बोलणारा तो महाराष्ट्रीय आहे. मराठी हे नाव प्राचीन पुरातन आहे. शिलालेख,

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील वाङ्मय शब्द अलीकडे वापरला जात आहे. प्राचीन काळी वाङ्मयाला काव्य, साहित्य आदी शब्दाने संबोधले जात असते. काव्य, साहित्य आणि वाङ्मय एका अर्थाने वापरले असले तरी आज वाङ्मय शब्द योग्य आहे. कारण वाङ्मयात ललित आणि ललितेतर दोन भाग येतात. ललितमध्ये कथा, कविता, नाटक, कांदबरी तर ललितेतर वाङ्मयात तत्वज्ञान, वैचारिक, संगीत, कला आदि येतात. तर चरित्र-आत्मचरित्र सीमारेषेवर येतात. वाक म्हणजे बोलणे, मय म्हणजे युक्त. वाणीयुक्त आपण जे बोलतो, लिहितो ते अर्थपूर्ण असावे. जे मानवी मूल्य जपणारे, मानवाच्या मनावर संस्कार करणारे, उदबोधक, प्रबोधन, मनोरंजन करणारे व टिकवून ठेवणारे अर्थपूर्ण महत्त्वपूर्ण लेखनास वाङ्मय असे संबोधले जाते. वाङ्मय ललित साहित्य आहे. वाङ्मय संकल्पना समजून घेण्यासाठी समीक्षा शास्त्राचा आधार घ्यावा लागतो. त्यांनतर आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास यात मुलभूत फरक

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची पार्श्वभूमी लक्षात घेताना प्रथम आपणास आधुनिक म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. आधूनिक कालखंड हा साधारणपणे इंग्रजी सत्तेच्या प्रारंभापासून म्हणजेच १८१८ पासून धरला जातो. या कालखंडामध्ये घडलेल्या अनेकविध गोष्टी या पार्श्वभूमीसाठी कारणीभूत ठरतात. आधुनिकतेचा विचार आपण म्हणावा तेवढा करत नाही. परंतु आधुनिकता जर समजून घेतली नाही तर पुढील वाङ्मयाचा इतिहास, त्याची पार्श्वभूमी, त्याची निर्मिती प्रक्रिया आपल्या लक्षात येत नाही. म्हणून सुरवातीलाच आधुनिकतेचा विचार आपण करू या.

आधुनिकता ही मूल्यवाचक आहे. ती गुणवाचक आहे तशीच कालवाचक आहे. १८१८ पासून आपण खऱ्या अर्थाने आधुनिक कालखंड किंवा अर्वाचीन कालखंड असे म्हणतो. आणुनिक ही संज्ञा संमिश्र अशा स्वरूपाची आहे. एकाचवेळी ती गतिमान आहे. लवचिक आहे. आधुनिकता आणि नवता हे समानार्थी शब्द आहेत.

आधुनिकतेचा संबंध विज्ञान निष्ठेशी आहे. १९ व्या शतकातील राजकीय, सामाजिक घडामोडीशी आणि स्थित्यंतराशी आहे. जगातील दोन मोठ्या महायुद्धांशी आहे. वैज्ञानिक संशोधनाशी आहे. वैचारिक क्रांतीकारक परिवर्तनाशी आहे. जगातील औद्योगिक क्रांतीशी आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या क्रांतीने दिलेल्या नवविचाराशीही तिचा संबंध आहे.

पाश्चात्य संस्कृतीतून आपल्याकडे आधुनिकता आली आहे. युरोपियन जगतात आधुनिकतेचा उगम प्रथम झाला व नंतर आपण अनुकरणातून क्षीणपणे तिचा स्वीकार केलेला आहे. कला व साहित्याच्या क्षेत्रात आधुनिकता आलेली दिसून येते.

करणे म्हणूनच आवश्यक ठरते.

वैज्ञानिक व वैचारिक संशोधनाबरोबरच व्यक्तिविकासक्रम लक्षात घेतल आधुनिकता लवकर समजेल. आधुनिकता ही नव्या राष्ट्रवादी, व्यक्तिवादी विचा जननी आहे असे आपणास लक्षात येईल. आधुनिकतेचा अंगिकार करूनच स व्यक्ती आणि राष्ट्र यांचा उत्कर्ष होईल.

आधुनिक जीवनदृष्टीचा मराठी वाङ्मयाशी संबंध दृढपणे आलेला आहे समजून घेण्यासाठी आतापर्यंत आपण हे विवेचन पाहिले. आधुनिकतेची संक आपल्या मनामध्ये तयार झालेली असेल. याच कालखंडामध्ये इंग्रजी शिक्षणाचा आणि प्रसार हा प्रामुख्याने होतो. इंग्रजी शिक्षण घेवून नोकरी मिळवणे व एक जीवन पद्धती स्वीकारणे असा लोकांमध्ये कल वाढू लागला. पूर्वी गुरूगृही राहून शि

असत पण आता इंग्रजी शाळा सुरू झाल्या होत्या व शिक्षणाची सार्वत्रिक व्यवस्था तयार होवू लागली होती. वेगवेगळे विषय, अभ्यासक्रम अभ्यासार्थ येवू लागले आणि अशा शिक्षितांना नोकऱ्या मिळू लागल्या म्हणून इंग्रजी शिक्षणाचा प्रचार, प्रसार हा सुद्धा मराठी वाङ्मयाच्या दृष्टिने अत्यंत महत्वपूर्ण असा ठरला आहे.

इंग्रजी शिक्षणाने इंग्रजी वाङ्मयाचा परिचय होवू लागला. परंपरेने संस्कृत वाङ्मयाचा थोडाफार परिचय होताच त्यात वाढ होवू लागली. त्यातून वाङ्मय निर्मितीची बीजे दिसू लागली व मराठी वाङ्याची निर्मिती या कालखंडात सुरू होताना आपणास दिसून येते.

पाश्चात्यांच्या प्रभावामुळे व अनुकरणाने वाङ्मय निर्मितीला या कालखंडामध्ये बहर आलेला आपणास दिसून येईल. मुख्य म्हणजे इंग्रजी शिक्षणाने निर्माण झालेल्या नव्या प्रवृत्ती, नव्या प्रेरणा, विज्ञाननिष्ठा, सुधारणावादी दृष्टीकोण, ऐहिकतावादी दृष्टीकोण समाजामध्ये निर्माण होवू लागले होते. आधुनिक काळातील प्रबोधनामुळे संस्कृतिक व सामाजिक दृष्टीकोणात परिवर्तन होवू लागले. एकूणच समाजामध्ये आधुनिक मूल्यभान निर्माण झालेले आपणास दिसून येईल. या सर्व बाबींचा येथील वाङ्मय निर्मितीवर प्रभाव पडलेला आपणास दिसून येईल.

या संक्रमण काळात अनेक गोष्टी आधीच्या काळातील टिकून राहिलेल्या आहेत. या सर्वच गोष्टी आदर्श होत्या. उदा. संतांची कविता, पंतांची कविता ही पुढील कालखंडामध्ये आधुनिक कवितेला पोषक ठरलेली दिसून येईल. या कालखंडामध्ये भाषांतरकारांचा एक वर्ग तयार होवू लागला. इंग्रजीतून मराठीत भाषांतरे आणि संस्कृतमधून

मराठीत भाषांतरे होवू लागली. सामान्य वाचकाला यामुळे चांगलेच सकस वाङ्मय अभ्यासाला मिळू लागले. रामायण, महाभारतातील गोष्टी असो की कालिदासाची नाटके असो किंवा शेक्सपीअरची नाटके असो या सर्वांचा परिचय आपणास होवू लागलेला दिसून येतो.

इंग्रजांनी केलेल्या भौतिक सुधारणा यामुळे जीवनमान बदलू लागले. समाजामध्ये नवशिक्षितांचा वर्ग तयार होवू लागला. तसेच इंग्रजांनी टपाल व्यवस्था व दळणवळणसाठी रेल्वे या दोन गोष्टी सुरू केल्यामुळे नवे नवे उद्योगधंदे व नव्या नव्या व्यवस्था भारतींयाना अनुभवायाला मिळाल्या दळणवळण झपाट्याने वाढले व त्याचबरोबर भारताच्या विशालतेची व व्यापकतेची जाणिव माणसांच्या मनामध्ये निर्माण झाली. या सर्व बाबीतून मराठी वाङ्मयाच्या निर्मितीला एक व्यापक पार्श्वभूमी तयार झाली हे आपण लक्षात घेतले पाहिजेत. यानंतर आधुनिक कालखंडात निर्माण झालेले विविध वाङ्मय प्रकारांची पार्श्वभूमीची थोडक्यात आपण चर्चा करू या.

निबंध हा वाङ्मय प्रकार खास महाराष्ट्रीयन आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ व इतर अनेकांनी मध्ययुगीन कालखंडामध्ये टीकाग्रंथ, भाष्यग्रंथ, विवेचन ग्रंथ, समीक्षा ग्रंथ लिहिलेले आपणास दिसून येते. याचाच परिपाक पुढे निबंध वाङ्मयात झालेला

विष्णुशास्त्री विपळूणकरापासून ते लोकमान्य टिळकापर्यंतच्या निबंधाकडे पाहिल्यावर आपणास दिसून येईल. निबंधामध्ये अनेक विषय येवू लागले. मुबंई समाचार, दर्पण, इत्यादी नियतकालिकांनी गद्य लेखनाला प्रारभ केलेला आपणास दिसून येईल. निबंध वाङ्मयाची ही पार्श्वभूमी लक्षात घेवून आपण त्याचा विचार केला पाहिजे.

यानंतर काव्य वाङ्मयाचा विचार करतांना येथील संत कवींची कविता, पंत कर्वीची व तंत कवीची कविता ही सर्व मध्ययुगामध्ये कविता धार्मिक प्रेरणा घेवून पारलौकिकाचा विचार करणारी कविता एवढ्या मर्यादित अर्थाने आपण पाहू नये. आधुनिक कालखंडातील कविता या कवितेवरच परिपुष्ट झालेली दिसून येईल. निसर्ग कविता, भाव कविता, प्रेम कविता, नाट्य कविता, कथा कविता ही या कालखंडात निर्माण होवू लागली. पूर्वीची खंडकाव्ये, महाकाव्ये यांना आदर्शभूत अशी अभ्यासण्या करता समोर होती.

आधुनिक कवितेने विशाल व व्यापक असा दृष्टीकोन अंगीकारून नव्या युगाचा नवा शिपाई मी कसा आहे? याची तुतारी फुंकलेली आपणास दिसून येईल. आधुनिक कालखंडातील सर्व कविता ही पाश्चात्यांच्या अनुकरणातून आलेली आहे असे म्हणणे ही कधीकधी त्या कवींच्या कवितेवर अन्याय करणारे वाटू लागते. आधुनिक कालखंडातील कविता समजून घेतांना त्या कवीच्या जीवनादृष्टीचा परिचय करून घेणे गरजेचे असते तेव्हाच आपणास ही कविता समजेल.

नाट्य वाङ्मयाचा विचार करतांनाही आपणास येथील लोकवाङ्मयातील नाट्याचा विचार करावा लागेल. लोकसंस्कृतीमधील मसनजोगी, पोतराज, गोंधाळी इत्यादी लोकगायक हे स्वतंत्र वेशभूषा, केशभूषा करणारे आहेत. तसेच प्रत्येकाचे वाद्य भिन्न भिन्न आहेत. त्यामुळे सातत्याने येथील समाज जीवनात त्यांच्या नाट्यमय अवतरणाने प्रभाव दिसून येतो. कीर्तन करणारा कीर्तनकारही विशिष्ट पोशाख, कंबर बांधणे, पटका घालणे, चिपाळ्या हातात घेणे, विणा घेणे, विशिष्ट जागी उभा राहून पायांनी ठेका धरणे, पदन्यास करणे, नृत्य गायन करणे हा सर्व एक प्रकारचा या कथेकऱ्यांचा एकपात्री नाट्यमय प्रयोगच आपल्या संस्कृतीत दिसून येतो.

तमाशा ही महाराष्ट्राची लोककला आहे. या तमाशामध्ये सोंगाड्या हे एक पात्र असे तमाशात सुरूवातीला गण होतो. गण झाल्याबरोबर स्टेजवर सोंगाड्या येवून क्षणातच 'ही पहा मुबंई', 'अबब... ही माडी' असे म्हणून क्षणातच नेपथ्य निर्माण करतो. भोवताली फिरूनच आपला प्रवास दाखवतो. म्हणजेच हा सोंगाड्या आपल्या शब्दातूनच नाट्याची ही अंगे तयार करतो, तमाशामध्ये वग नाट्य सादर करीत असत. संध्याकाळी ९ ते १२ गणगवळण आणि बतावणी असे. १२ ते ३ वगनाट्य व ३ ते ६ गवळणी, भुपाह्या होत असत. एकूणच तमाशा पूर्ण रात्रभर मनोरंजन करणारा घटक होता. तीन पिढ्यांचे मनोरंजन तो करत असे. अशा या तमाशातूनच मराठी नाटकाचा उदय झालेला आपणास दिसून येईल.

इंग्रजी नाटकाचा व संस्कृत नाटकाचा दोन्हीचाही प्रभाव मराठी नाटकावर दिसून

येतो आणि म्हणूनच सुरूवातीच्या कालखंडातील सौभद्र, शारदा ही नाटके खूप गाजली. संगभूमीचा झालेला उदय हा मराठी नाटकांना पोषक ठरला. पौराणिक, धार्मिक, सामाजिक, ऐतिकासिक अशा नाटकांनी मराठी वाङ्मय समृद्ध झाले. नाटकांचे पुस्तकेही निघू लागली व त्यांचे प्रयोगही होवू लागले आणि म्हणून आधुनिक कालखंडामध्ये समृद्ध झालेला नाट्यवाङ्मय हा प्रकार अभ्यासणीय आहे.

कथा आणि कादंबरी ही दोन्हीही कथनात्म वाङ्मयाची वेगवेगळी रूपे आहेत, मराठी वाङ्मययत कथेचे दालन समृद्ध आहे. लोककथा, अख्यायिका, दंतकथा, प्रामाणिकथा, दैवतकथा, गुढकथा, भयकथा, रंजककथा पूर्वीपासून प्रचालित आहेत. पंचतंत्र, हितोपदेश, सिहासन बत्तीशी, शुकद्वादशी, भोजराजास आणि कालिदास यांच्या कथा, रामायण महाभारतातील कथा असा समृद्ध कथेचा वारसा कथनात्म वाङ्मयाला लाभलेला आहे. म्हणून पाश्चात्य देशातून आलेल्या कथा वाङ्मसाला येथील कथा वाङ्मयांनी चटकन आपलेसे केले आणि कथेचे दालन समृद्ध झाले.

झाला. यामुळे आधुनिक कालखंडात लवकर लोकप्रिय झालेला वाङ्मय प्रकार आहे.

नॉव्हेल या शब्दाला कांदबरी हा प्रतिशब्द मराठीमध्ये वापरला जातो. बाणभट्टाने कांदबरी लिहिलेली आहे. खरे तर कादंबरी हे त्याच्या नायिकेचे नाव आहे. पण तेच नाव मराठीतील लोकप्रिय अशा मोठ्या वाङ्मय प्रकाराला पडले आहे. सुरूवातीला अद्भूतरम्य व प्रेमकथा असणाऱ्या कादंबऱ्या या कालखंडात येवू लागल्या. परंतु कांदबऱ्यांनीही चटकन धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक अशा विविध अंगाने आपली निर्मिती केलेली दिसून येईल.

कादंबरीमध्ये एखाद्या विशिष्ट जीवनाचा संपूर्ण जीवनपट व्यक्त केलेला असतो. स्थूलपणे कादंबरीला एक कथानक असते. व्यक्तिविशिष्ट संवाद, भाषेची लय, आदर्शभूत कल्पना, वास्तवाच्या जवळ भिडणारी दृष्टी आणि स्वतंत्र असे विशिष्ट तत्वज्ञान यामुळे कादंबरीने आधुनिक मराठी वाङ्मयाचा खूप मोठा भाग व्यापलेला आपणास दिसून येतो. प्रादेशिक, राजकीय, ग्रामीण अशा विविध वळणांनी आधुनिक कादंबरी सतत चर्चेचा विषय राहिलेली आहे.

मूल्ये व जीवनमूल्येच निर्धारीत केलेली आपणास दिसून येते. म्हणून आधुनिक कादंबरी अभ्यासण्यापूर्वी ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक ठरते.

याशिवाय प्रवास वर्णन हाही वाङ्मय प्रकार आधुनिक कालखंडात आस्तित्वात असलेला दिसून येतो. मध्ययुगीन कालखंडात तीर्थयात्रा करणे हे भारतीयांच्या जीवन दृष्टीचे एक मूल्य होते. त्यातून तीर्थक्षेत्रांच्या माहितीचे व भौगोलिक माहितीचे ग्रंथ कालखंडात निर्माण झाले. सिंधबादच्या सफरीसारखे ग्रंथही लिहिल्या गेले. बखर वाङ्मयातून आलेल्या पाणीपतची बखर, महिकावतीची बखर हे ग्रंथही एक प्रकारच्या लढाईच्या वर्णनाबरोबर स्थलवर्णनाच्या दृष्टीनेही उत्तम नमूने म्हणून पाहता येतील. माझा प्रवास हे गोडसे भटजीचे प्रवास वर्णन या कालखंडात अत्यंत लोकप्रिय झालेले आपणास दिसून येते.

आपणास दिसून येते.

चरित्र लेखन हा खरे तर आदर्शभूत असा वाङ्मय प्रकार आहे. मध्ययुगीन कालंडात राजा महाराजांची, साधू सत्पुरूषांची, संत महात्म्यांची चरित्रे, भक्त चरित्रे वर्णिलेली दिसून येतात. आधुनिक कालखंडात त्या धरतीवर व्यक्तिचरित्र लिहिण्यावर भर दिलेला दिसून येतो. सामान्यांची चरित्रे या कालखंडात येवू लागली आणि चरित्र लेखनाची काही संकेत या कालखंडात रूढ होत होती. त्याच बरोबर आत्मनिवेदन भक्तितून आलेली स्वतःची चरित्रे संतांनी गायिली आहेत. आधुनिक कालखंडात त्याचेच रूप आत्मचरित्र वाङ्य प्रकारात झालेले दिसून येते.

आत्मचरित्र लिहिणारा आधुनिक कालखंडात स्त्री–पुरूषांचा एक वर्ग महाराष्ट्रात तयार झालेला दिसून येतो. त्यामुळे आत्मचरित्र लिहिणे अत्यंत कठिण काम आहे. सत्यदर्शन, प्रांजळपणा, प्रमाणिकता ही काही त्याची वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील. सत्याच्या कसोटीवर उभारलेली आत्मचरित्र ही लोकप्रिय व वाचनिय होताना दिसून येतात. आधुनिक कालखंडात आत्मचरित्राचा हा प्रवाह सातत्याने वाहता राहून लेखक, कवी, समाज सुधारक, प्राध्यापक, प्राचार्य, नट–नटी, नायक, अभिनेता– अभिनेत्री आणि नेता इत्यादी सर्वांनीच आत्मचरित्राचे लेखन केलेले दिसून येते.

आतापर्यंत आपण निबंध, काव्य, नाट्य, कथा, कांदबरी, प्रवास वर्णन आत्मचरित्र आणि ललित गद्य अशा सर्व वाङ्मय प्रकारांच्या निर्मितीच्या पाठीमागील असणाऱ्या मध्ययुगीन परंपरा आणि वारसा यांच्या पार्श्वभूमीचा विचार येथपर्यंत केलेला आहे. तो सर्व विद्यार्थ्यांने आत्मसात करावा तेव्हाच खऱ्या अर्थाने मराठी वाङ्मयाचा इतिहास समजून घेता येईल. खरे तर ती पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना स्थूलपणे वाङ्मय प्रकार कळावेत यासाठी थोडक्यात व्यक्त केलेली आहे. ती निश्चितच उपयुक्त होईल असा मला विश्वास वाटतो.

# धन्यवाद !